रे.मु.नं. १०/२०२३

निशाणी ८ खाली

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष**

नाव – प्रशांत पंढरी भडांगे

वय– ३४ वर्षे धंदा – नोकरी

पत्ता– रा. लक्ष्मी अंगण सोसायटी, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

**वादीतर्फे विधीज्ञ श्री. आय.एम. इनामदार यांच्यातर्फे शपथेवर सरतपास सुरु–**

आता मला निशाणी ३ सोबत अनुक्रमांक २ वरील कागद दाखविण्यात आला. सदरचा कागद हा स्वप्नाली सुरेश घोलप यांचा खाते उतारा आहे. सदरचा उतारा हा मी आमच्याकडील असणा–या सिस्टीम मधुन प्रिंट काढुन दिलेला आहे. सदर खाते उता–यामधील नमुद माहिती आमच्या रेकॉर्ड प्रमाणे खरी व बरोबर आहे. सदर खातेउता–यास **निशाणी २१** देण्यात येत आहे. मी विवेक भागवत पवार हे मॅनेजर आमच्या कार्यालयात होते. त्यांना मी ओळखतो. मला आता निशाणी १६ सोबत अनुक्रमांक १ वरील कागद दाखविण्यात आला. सदरचा कागद हा आमचे पुर्वीचे शाखा अधिकारी विवेक भागवत पवार यांनी दिलेले प्रमाणपत्र आहे. त्या प्रमाणपत्रात असे नमुद आहे की, खाते उता–यातील मजकुर खरा व बरोबर असुन ते सिस्टीम जनरेट आहे त्याला सहीची आवश्यकता नाही. सदर प्रमाणपत्रावर पवार यांची सही व शिक्का आहे त्यास **निशाणी २२** देण्यात येत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादीतर्फे कोणीही हजर नाही. सबब, साक्षीदाराचा उलटतपास नाही.**

**उलटतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

RAVINDRA BHAGVAN KHAWALE

Digitally signed by RAVINDRA BHAGVAN KHAWALE
Date: 2025.08.06 16:09:30 +0500

**( आर. बी. खवले )**

दि. ०६.०८.२०२५

२रे सह दि.न्या.क. स्तर,श्रीगोंदा,

जि.अहमदनगर